# जनसंपर्क अधिकारी
## पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार
## यांचे कार्यालय

सेक्टर ५, रामनगर, शांतीगार्डन, मिरा-रोड(पुर्व), ठाणे.४०११०७
फोन नंबर-०२२-२९४५१००३.
Email ID-pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


दिनांक :- ०६/०३/२०२१

**प्रेस नोट-५०**

**कंपनीत चोरी करणारा कामगार आरोपीतास अटक करुन त्याचेकडुन गुन्हयातील चोरीस गेलेला माल एकुण ८,४०,०००/- मुद्देमाल हस्तगत करण्यास वालीव गुन्हे प्रकटीकरण शाखेस यश.**

वालीव पोलीस ठाणे हद्दीत दिनांक २७/०२/२०२१ रोजी रात्रो १०.०० वा ते दिनांक ०१/०३/२०२१ रोजी सकाळी १०.०० वा चे दरम्यान गाला नं ०१,०२,०९,१०,११,१२, निधी इंडस्ट्रीयल इस्टेट, गोल्डन चॅरिट हॉटेल समोर, भुतपाडा येथे डेको मेटल नावाची स्टेलनेस स्टिल प्रोसेसिंगची खाजगी कंपनी, वसई पुर्व ता. वसई, जि. पालघर येथे फिर्यादी यांचे कंपणीत पुर्वी कामास असलेला आरोपीत मनोजकुमार कालीचरण सरोज यांचे जवळ असलेल्या कंपणीच्या चावीने कंपनीत आत प्रवेश करुन आरोपीत याचे साथीदार पाहिजे आरोपीत यांचे मदतीने फिर्यादीचे कंपणी मधील स्टेलनेस स्ट्रिलच्या ४२ प्लेट फिर्यादीच्या संमतीशिवाय स्वत:चे फायदया करीता लबाडीच्या इरादयाने चोरी करुन चोरुन नेल्या आहे म्हणुन गु.नों.क्र. २४४/२०२१ भा.दं.संहिता कलम ३८१, ३४ अन्वये गुन्हा दाखल होता.

दिनांक ०५/०३/२०२१ रोजी २२.२३ वाजता आरोपीत मनोजकुमार कालीचरण सरोज याचा शोध घेऊन त्याने चोरी केलेल्या गुन्हयात वापरलेल्या वाहनानसह मिळुन आल्यास त्यास अटक करुन त्याचे गुन्हयात वापरलेले एक महिंद्रा कंपनीची पिकअप जिप क्रमांक एम.एच.४८ ए.वाय.०२६९ वाहन व स्टेलनेस स्ट्रिलच्या ४२ प्लेट असा एकुण ८,४०,०००/- किंमतीचा माल हस्तगत करुन गुन्हा उघडकिस आला आहे.

सदरची कामगिरी श्री. प्रशांत वाघुंडे, पोलीस उप आयुक्त, परीमंडळ-३ विरार, श्री. अमोल मांडवे, सहाय्यक पोलीस आयुक्त, तुळीज विभाग, वालीव पोलीस ठाणे वरीष्ठ पोलीस निरीक्षक श्री. विलास चौगुले, पोनि/श्री. चंद्रकांत सरोदे, यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे प्रकटीकरण पथकाचे स.पो.नि./ज्ञानेश फडतरे, पो.हवा./मनोज मोरे, मुकेश पवार, योगेश देशमुख, पो.ना./सचिन दोरकर, किरण म्हात्रे, राजेंद्र फड, अनिल सोनवणे, पोशि/ विनेश कोकणी, बालाजी गायकवाड, सचिन बलीद, गजानन गरीबे, यांनी केलेली आहे.